सकाळ
सिंधुदुर्ग, शुक्रवार, ११ डिसेंबर २०१५
३

# तरुणांनो भारतीय संस्कृती अभ्यासा

## राजेंद्र आर्लेकर : केर येथे विद्यापीठस्तरीय विशेष निवासी शिबिर

सकाळ वृत्तसेवा

दोडामार्ग, ता. १० : पर्यावरण संवर्धनासाठी तरुणांनी भारतीय संस्कृती अभ्यासावी, असे मत गोव्यातील पर्यावरणमंत्री राजेंद्र आर्लेकर यांनी केर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यापीठस्तरीय निवासी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी केले.

ते म्हणाले, "पर्यावरणाच्या असंतुलनामुळे दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टीसारख्या भयानक संकटांना थांबवायचे असल्यास तरुणांनी पुढाकार घेऊन पर्यावरण संवर्धनाच्या विविध उपाययोजना राजवाड्यात केवळ चार भिंतीच्या आत राहून पुस्तकी पर्यावरण न शिकता आपल्या संस्कृतीचा. अभ्यास करावा. संस्कृतीनेच आपल्याला पर्यावरण संवर्धन शिकविले आहे, असे प्रतिपादन गोवा राज्याचे वन, पर्यावरण व पंचायतमंत्री राजेंद्र आर्लेकर यांनी केले. ते येथील मुंबई विद्यापीठ सेवा योजना विभाग व लक्ष्मीबाई सीताराम हळवे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने केर येथे आयोजित केलेल्या सात दिवशीय विद्यापीठस्तरीय विशेष निवासी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. व्यासपीठावर मुंबई विद्यापीठ महाविद्यालयाचे व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. अनिल पाटील, मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक प्रा. बी. एन. भिडवे, केर-भेकुर्ली ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच प्रेमानंद देसाई, संस्थेचे सचिव मोहन खातू, सदस्य भाई परमेकर, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेटये होते. प्रमुख पाहुणे डॉ. पाटील यांनीही स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. सरपंच देसाई यांनी या वेळी गावात राबविलेल्या विविध योजना, तसेच गावाला मिळालेल्या विविध पुरस्कारांची माहिती दिली. प्रा. बिडवे यांनीही आपल्या मनोगतात पर्यावरण संवर्धनाचे आवाहन केले. या वेळी हेगशेटये म्हणाले, "प्राचीन संस्कृती आपणास ऊर्जा देण्याचे काम करते. ती आपल्याला पर्यावरण संवर्धनाची प्रेरणा देते." या वेळी त्यांच्या हस्ते श्री. आर्लेकर, डॉ. अनिल पाटील, प्रा. बी. एस. बिडवे, श्री. देसाई यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शिबिरास मुंबई, पालघर ठाणे, रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांचे १०० स्वयंसेवक उपस्थित होते. मोठ्या संख्येने ग्रामस्थ, संस्थेचे पदाधिकारी, जिल्हा कार्यक्रम समन्वयक डॉ. कोतवाल, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी शिबिरास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. ए. मोरे व डॉ. एस. यु. दरेकर, तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सोपान जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आर. ए. मोरे यांनी आभार मानले.

**प्रत्येकामध्ये सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण झाली पाहिजे. केवळ गुणवान न होता आदर्श नागरिक बना, यासाठी हे शिबिर तुम्हाला नीतीमूल्य शिकवेल. ही सारी शिजोरी आयुष्यभर पुरेल.**
**- राजेंद्र आर्लेकर**